MHBI140011002024

सरकार वि. विजु वाघमारे
नि. क्र. १० खाली

## न्यायनिर्णय

(अधिघोषणा दिनांक ०२ सप्टेंबर, २०२५)

खटल्याचे निर्णयाकरीता खालील मुद्दे उत्पन्न होतात. त्यावरील निष्कर्ष मी खालील नमुद केलेल्या कारणमिमांसेसह विषद करीत आहे –

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपी हा दिनांक १७/०४/२०२४ रोजी १५.१० वाजता मौजे कारखेल खुर्द, ता.आष्टी, जि.बीड येथील अहमदनगर ते अंमळनेर मार्गे बीड जाणारे रोडवर हॉटेल निसर्ग मध्ये त्याच्या ताब्यात १६ नग प्रत्येकी १८० मि.ली. ने भरलेल्या देशी दारुचा मुद्देमाल स्वतःच्या फायदयासाठी किंवा विक्रीसाठी बाळगतांना मिळुन आला ? | **नाही.** |
| २) | आदेश काय? | **अंतिम आदेशान्वये आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

२. अभियोग पक्षाने आरोपीच्या विरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता केवळ ०१ साक्षीदार तपासला. साक्षीदार क्र.१ संजय दत्तु चौधरी – घटनास्थळ व जप्ती पंच याला तपासण्यात आले. अभियोग पक्षातर्फे रासायनीक विष्लेशक यांचा अहवाल दाखल करण्यात आला नाही. अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच आरोपीचे कलम ३१३ चे बयाण नोंदवीण्यात आले नाही. आरोपीने बचावात कोणताही पुरावा दिलेला नाही.

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता</u>** –

३. साक्षीदार क्र.१ संजय दत्तु चौधरी हा घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच असुन त्याने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, त्याला पोलीसांनी पंचनाम्यासाठी कोठेही बोलावुन घेतले नव्हते व त्याच्या समक्ष पंचनामा केला नव्हता. प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर त्याची सही आहे. ती तो ओळखतो. त्यातील मजकुराची त्याला माहिती नाही. अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. परंतु साक्षीदारांनी अभियोगपक्षाचे केसला समर्थन होईल अशी कोणतीही सुचना मान्य केली नाही.

४. अभिलेखावरील पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अभियोगपक्षाने रासायनीक विश्लेशन अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे पंच साक्षीदाराची साक्ष आरोपीचे अपराधित्व सिध्द करण्यास पुरेशी नाही. त्यामुळे अभिलेखावरील पुराव्यावरुन आरोपीकडुन देशी दारु जप्त करण्यात आली, जप्तीतील मुद्देमालातुन रासायनिक परिक्षणाकरीता नमुना तयार करण्यात आला हे सिध्द होत नाही. परिणामतः अभियोगपक्ष आरोपी हा स्वतःच्या ताब्यात देशी दारु बाळगतांना मिळुन आला ही बाब शंकेपलीकडे जाऊन सिध्द करु शकला नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता</u>** –

५. मुद्दा क्र.१ च्या निष्कर्ष व कारणमिमांसेवरुन अभियोगपक्ष आरोपीच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) नुसार गुन्हा केल्याचे सिध्द करीत नाही. त्यामुळे आरोपी हा सदर अपराधातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. जप्तीतील मुद्देमाल हा कायदेशीर विल्हेवाटी करीता राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे पाठविणे उचित व न्यायोचीत ठरेल. अतंतः मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो –

## <u>आदेश</u>

१. आरोपी विजु किसन वाघमारे, रा.घाटशिरस, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर, ह.मु.

कारखेल खुर्द, ता.आष्टी, जि.बीड याला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदयाचे कलम ६५(ई) या गुन्ह्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल देशी दारु ही कायदेशीर विल्हेवाटीकरीता राज्य उत्पादन शुल्क विभाग, बीड यांचेकडे पाठविण्यात यावी.

४. फौजदारी प्रकीया संहितेचे कलम ४३७ (अ) विचारात घेता या न्यायनिर्णयास आव्हान देण्यात आल्यास अपिलीय न्यायालयासमोर आरोपीची हजेरी निश्चित करण्याकरीता त्याने या आदेशापासुन पुढील सहा महिन्याकरीता रुपये १५,०००/– चे जामीन बंधपत्र करुन द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.)

KESHAV KRISHNA KHOMANE
Digitally signed by KESHAV KRISHNA KHOMANE
Date: 2025.09.03 10:31:57 +0530

ठिकाण – आष्टी
दिनांक – ०२/०९/२०२५.

(के. के. खोमणे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), आष्टी.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 02/09/2025 |
| Transcribed on | : | 02/09/2025 |
| Checked & signed on | : | 02/09/2025 |

**Sd/-**
Jalindar B. Pokale,
(Stenographer Grade-III)